अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, दादर, मुंबई यांच्या न्यायालयात (न्यायालय क.५)
केस नंबर ८६६/पी.एस/२०२१
वि. स्था. गुन्हा क./२०२१

DADAR POLICE STATION

*Versus*

KISHOR MARUTI PATIL AND OTHERS.

निशाणी १ वरील आदेश

प्रस्तुत केस मधील आरोपींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२-अ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदरहु केसमध्ये आरोपी गैरहजर राहतात म्हणुन त्यांचेविरूध्द अजामीनपात्र वॉरण्ट काढण्याबाबत हुकुम झालेला होता. तसेच आरोपी गैरहजर राहतात म्हणुन अदयाप आरोपींचे संक्षिप्त संपरिक्षा (Plea) नोंदविण्यात आलेली नाही.

सदरची केस ही सुमारे ०५ वर्ष इतकी जुनी आहे. नामदार उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे जुनी प्रकरणे अत्यंत शीघ्र गतीने निकाली करणे आवश्यक आहे. परंतु सदरहु केसमध्ये गेल्या सुमारे ०५ वर्षात कोणतीही प्रगती झालेली नाही.

अशा परिस्थितीत सदरची केस ही कोणत्याही परिस्थिती निकाली होण्याची शक्यता नाही, असे मला वाटते. त्यामुळे सदरहु केस ही आहे त्या स्थितीत पडून न ठेवता फौ. प्र.सं.कलम २५८ प्रमाणे बंद करणे मला योग्य वाटते.

सबब सदरहु प्रकरण हे फौजदारी प्रकिया सहिता कलम २५८ प्रमाणे बंद करण्यात येत आहे (stop proceeding ) व आरोपींना (Discharge) करण्यात येत आहे. आरोपींचे जामीनबंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येतात. सदरहु केसमधील जप्त मुद्देमालाचा नाश करण्यात यावा व रोख रक्कम सरकारजमा करण्यात यावी.

सदरहु हुकूमाची अभियोग पक्षाने नोंद घ्यावी.

(न्यायालयासमोर घोषीत केले)

22/07/2026

दिनांक २२.०७.२०२६

(अ. अ. मेहेंदळे)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
५ वे न्यायालय, दादर, मुंबई.